
दिवाळी २०२०

# शब्दालय

## सातपाटील कुलवृत्तांत विशेषांक



# शब्दालय दिवाळी २०२०

## सातपाटील कुलवृत्तांत : विशेषांक

संपादक : **सुमीत लांडे**


### ◆ समीक्षा :

- **वंशश्रेष्ठत्वाच्या दंभावर प्रहार करणारी प्रागतिक कादंबरी :**
  राकेश वानखेडे/ ९
- **मानवी 'अहं'ना नख लावणारी कादंबरी :**
  नीतीन रिंढे/ १३
- **मराठी कादंबरीच्या विकासाची नवी दिशा सूचित करणारी कादंबरी :**
  नीलकंठ कदम/ २१
- **भाषेच्या जीवाश्मांमध्ये लपून राहिलेल्या मुळांचा शोध :**
  विनायक येवले/ २९
- **स्त्रीत्वाची महती सांगणारी पुरुषार्थाची गाथा :**
  प्रतिक पुरी/ ४४
- **प्रस्थापित संस्कृती-विचारांना छेद देणारी कादंबरी :**
  अविनाश सप्रे/ ५६
- **बखर लेखनाची वैशिष्ट्ये सामावलेली कादंबरी :**
  डॉ. अरुणा दुभाषी/ ६२
- **काळाचे नाद-निनाद :**
  अेकनाथ पगार/ ६४
- **पर्यायी इतिहासाची दृष्टी देणारी कादंबरी :**
  नंदकुमार मोरे/ ९०
- **काही बीजात्म स्त्रीरूपांचा शोध :**
  प्रवीण दशरथ बांदेकर/ १०४
- **देशीयतेच्या उपयोजनाचे स्पष्ट उदाहरण :**
  डॉ. किशोर सानप/ ११२
- **महाराष्ट्रीय संस्कृतीचा कुलवृत्तांत :**
  केदार काळवणे/ १३४
- **जिथे संपते तिथूनच सुरू होणारी कादंबरी :**
  सुचिता खल्लाळ/ १३६
- **मराठी माणसांचा (मराठ्यांचा) वृतांत :**
  शंकर विभुते/ १४०
- **वांशिक दुराभिमानाला धक्का देणारी कादंबरी :**
  कौस्तुभ पटाईत/ १४४
- **आत्मशोधातून सत्वशोधाकडे जाणारी कादंबरी :**
  राजीव जोशी/ १४७
- **महाकादंबरीची विस्तारणारी वाट... :**
  विजय चोरमारे/ १५२
- **जातीच्या अहंकाराला टाचणी :**
  विजय चोरमारे/ १५३
- **काही नोंदी :**
  दा.गो.काळे/ १५६
- **काळाची गोष्ट :**
  बालाजी सुतार/ १६५
- **स्वतःचा वेगळा रस्ता शोधणारी कादंबरी :**
  विश्वनाथ शिंदे/ १६९
- **नवी उर्जा देणारी कादंबरी :**
  डॉ. गणपतराव ढेंबरे/ १७४
- **बहुजनांच्या सांस्कृतिक पुनर्शोधाची कुळकथा :**
  डॉ.गणेश मोहिते/ १७८
- **गावगाड्यातील स्त्रियांची शहाणीव :**
  सुहास पाटील/ १८५

### ◆ प्रतिसाद :

- अभिषेक धनगर/१९१ • गणेश आवटे/१९३
- कविता ननवरे/ १९५ • जनार्दन वेर्लेकर/१९७
- अजय कांडर/१९९ • अंजली ढमाळ/२०१
- विलास शेळके/ २०३ • किरण लिमये/२०५
- सुप्रिया आवारे/२०६ • संजय भास्कर जोशी/२०८
- प्रमोद मुनघाटे/२१० • अरुणा सबाणे/ २११
- राहुल तांबोळी/२१२ • संजन मोरे/२१३
- दिलीप भाऊराव पाटील/ २१४
- सावित्री जगदाळे/२१६
- ले. कर्नल संजीव पटवर्धन/ २१९
- संतोष पद्माकर पवार/२२१
- समाधान महाजन/ २२६ • प्रतीक महेंद्र कदम २२८
- आनंद प्रतापराव जाधवराव/ २२३१
- लक्ष्मीकांत रांजणे/ २३३ • डॉ. एकनाथ आळवेकर/२३५ • प्रमोद भगवान पडवळ/ २४२

### ◆ प्रतिक्रिया :

- पपायरस बुक स्टॉल/श्रीपाद चौधरी/भूषण कोलते/१८८
- अमृता देसर्डा/१९४ • आशुतोष दिवाण/१९८
- भास्कर निर्मळ/२०० • जयदीप सावंत/२०७
- दादासाहेब खांडेकर/२११ • महेश भोसले/२१२
- उन्मेश एकनाथ अमृते/२१५ • स्वप्नील शेटे/२१८
- मनोज पाठक/२२० • मकरंद साठे/२२५
- नीरजा/२२७ • नितीन वैद्य/२३०
- प्रा. व्यंकटेश सोळंके/२३२ • जयदीप शिंदे/२३४
- ज्ञानदेव राऊत/२४१ • ॲड. अमोल पाटील/२४२
- स्वप्नील महेंद्र जाधवराव/२४३ • संगिता कुलकर्णी/२४४

### ◆ प्रकाशन कार्यक्रम भाषण :

- सुमती लांडे/२४५ • दीपक करंजीकर/२४६
- राजन खान२४९ • राजन गवस/२५३
- रंगनाथ पठारे/२५५ • प्रभाकर कोलते/ २५८


Scanned with OKEN Scanner

— केदार काळवणे
७०२०६३४५०२

# महाराष्ट्रीय संस्कृतीचा कुलवृत्तांत :

*आपल्या पूर्वजांच्या शोधाची सातपाटील कुलवृत्तांत ही कहाणी एकट्या लेखक रंगनाथ पठारे यांचा कुलवृत्तांत राहत नाही तर मागील सातशे वर्षातील महाराष्ट्रीय समाजजीवनाच्या स्थितीगतीचे पडसाद तीमधून ध्वनित झालेले आहेत. मराठीजनांच्या सांस्कृतिक संचिताचा दस्तावेज म्हणून या लेखनकृतीचे मोल अधिक आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अशा व्यापक भूप्रदेशाचा कॅनव्हास या कादंबरीला लाभला असला तरी तिचे मुख्य केंद्र हे महाराष्ट्र भूमी हेच आहे.*

भारतीय मौखिक कथनपरंपरांचा संस्कार रिचवत नव्या कथन शक्यता आजमावण्याचा सातत्याने प्रयत्न रंगनाथ पठारे यांनी केलेला आहे. कथन रचनेची वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली घडवत त्यांच्या कथा-कादंबऱ्यांनी मराठी साहित्याला वजनदार ऐवज देत नवे वळण दिले आहे. गेल्या चार दशकातील त्यांच्या कथा, कादंबरी आणि समीक्षेने मराठी साहित्याला दिग्दर्शित केलेले आहे. विचारवंत म्हणूनही ते महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. ताम्रपट या बहुआयामी कादंबरीने त्यांची श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून मराठीत ओळख स्थापित झालेली आहे.

आज ते मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून मराठी कादंबरी व्यवहाराच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांची नुकतीच 'सातपाटील कुलवृत्तांत' ही मागील सातशे वर्षांच्या कालपटावरील वंश, जात, धर्म, संस्कृती, समाज, राजकारण यांच्या विशाल पटाला सामावून घेत बदलत्या जगण्याची कुळकथा सांगणारी सातशे शहाण्णव पृष्ठांची बृहद कादंबरी प्रसिध्द झाली आहे. मराठा योध्दे, त्यांचे जगणे आणि स्थलांतर यांना केंद्रेवर्ती ठेवत माणसाच्या वाटचालीचा घेतलेला हा शोध मूल्यवान आहे. मानवी नातेबंध, त्यातील गुंतागुंत आणि विविध समूहांच्या काळपरिणामातून होणाऱ्या सरमिसळीचा कोलाज या कादंबरीतून साक्षात झालेला आहे. बदलत्या काळाच्या परिणामातून बदलत गेलेल्या माणूस नि समूहाच्या आयडेंटिटीचे स्वरूपही या कादंबरीतून अधोरेखित होते.

आपल्या पूर्वजांचे जीवन आणि मागील पिढ्यांची वाटचाल समजून घेण्याच्या कुतूहलातून या कांदबरीची निर्मिती झालेली आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून या कादंबरीचे लेखन रंगनाथ पठारे करत असल्याचे त्यांनी म्हटलेले आहे. अशाप्रकारच्या कादंबरी लेखनासाठी एक चिकित्सक संशोधनपूर्ण व्यासंग लागतो आणि त्या व्यासंगातून झालेल्या अभ्यासाला बौध्दिक पातळीवर शेकडो वर्षे मागे जाऊन चिंतनाच्या पातळीवर वास्तव वाटणारा चित्रपट डोळ्यासमोर ठेवत रेखाटावा लागतो. तो रेखाटण्यात पठारे कमालीचे यशस्वी झालेले दिसतात. वर्तमानातील गुंते हे इतिहासात दडलेले असतात. इतिहासाच्या शिकवणीतून वर्तमान अधिक सुरूप करता येतो. इतिहासच वर्तमानाला घडवत असतो.

वर्तमान जगण्यातील अनेकविध पेचांचे मूलस्त्रोत या कादंबरीतून उलगडलेले आहेत. त्यातून वर्तमानातील अनेक प्रश्नांची उत्तरे आपणाला मिळू शकतात. विशेषत: आजच्या दंभमय जातनिष्ठांचा पाया किती कमकुवत आहे हे या कादंबरीच्या अवलोकनातून लक्षात येते. रंगनाथ पठारे आपल्या कुळाची गोष्ट सांगताना परंपराशील होत नाही तर मानवतावादी दृष्टी स्वीकारून चिकित्सकपणे ही गोष्ट रचतात. वंश आणि जात अस्मितांना धक्का देणारी ही कादंबरी परिवर्तनवादी मूल्यविचार ठळक करणारी आहे. जातीव्यवस्थेचा तळ धुंडाळत तीमधील ठिसूळपणाची पोलखोल करणारी ही कादंबरी जातसंघर्षवाद्यांना आत्मभान देणारी आहे. जातनिर्मितीचा इतिहास या कादंबरीतून उजागर होतो. हा इतिहास आजच्या टोकदार झालेल्या जात अस्मितांना ठिसूळ करणारा आहे.

अल्लाउद्दीन खिलजीने इ.स.१२८९ साली पैठणवर स्वारी केल्याच्या निर्देशापासून या कादंबरीचा प्रारंभ होतो आणि साधारणत: इ.स.२००० पर्यंत या कुलवृत्तांताचा शेवट. या जवळपास सातशे-आठशे वर्षांच्या विस्तीर्ण अवकाशात अनेकविध आशयसमृध्द घटितांनी ही कादंबरी घडते. श्रीपती, साहेबराव, दसरत, जानराव, रखमाजी आणि पिराजी, शंभुराव, देवनाथ या प्रमुख व्यक्तिचित्रांच्या माध्यमातून या कादंबरीचे महाकथानक उभे राहते. त्या-त्या कालखंडातील या नायकांच्या संघर्षातून या कादंबरीतील कथानक उभे राहत या कुलवृत्तांताची गोष्ट साकारते. स्त्री व्यक्तिचित्रांचाही हे कथानक उभे करण्यात महत्वाचा वाटा आहे.

या कादंबरीतील स्त्रिया अत्यंत सामर्थ्यशीलपणे लेखकाने उभ्या केलेल्या आहेत. त्यामुळेच पुरुष व्यक्तिचित्रांपेक्षा त्यांचाच अस्तित्वजनक आवाज कादंबरीभर जाणवतो. जगण्याशी चिवटपणे टिकून राहण्याच्या स्त्रियांच्या आदिम-नैसर्गिक वृत्तीचा निर्मळ आविष्कार या कादंबरीतून झालेला आहे. या कादंबरीत आलेल्या स्त्रिया मातृसत्ताक समाजव्यवस्थेची आठवण करून देतात. सर्वसामान्य कष्टकरी माणसांच्या कहाण्याही या



Scanned with OKEN Scanner

कादंबरीतून समोर येतात. त्यांच्या भावविश्वाच्या अस्तित्वाने या कादंबरीच्या जागा भरलेल्या आहेत. या माणसांनी या कादंबरीला तोलून धरलेले आहे.

इतिहास आणि भूगोलाच्या व्यापक अवकाशाला कवेत घेत ही कादंबरी अनेकविध घटिते, पात्रे आणि उपकथानकांच्या आधारे महाराष्ट्रीय भूमीचे सत्त्व घेऊन उभी राहते. रूढ अर्थाने ही ऐतिहासिक कादंबरी नाही; तर ऐतिहासिकतेच्या परिप्रेक्षात वास्तव आणि कल्पिताच्या आधारे एका विशिष्ट समाजाचे जगणे आणि स्थित्यंतरांची महाकथा साक्षात करणारी आहे. आपल्या पूर्वजांच्या शोधाची ही कहाणी एकट्या लेखक पठारे यांचा कुलवृत्तांत राहत नाही तर मागील सातशे वर्षांतील महाराष्ट्रीय समाजजीवनाच्या स्थितीगतीचे पडसाद तीमधून ध्वनित झालेले आहेत.

मराठीजनांच्या सांस्कृतिक संचिताचा दस्तावेज म्हणून या लेखनकृतीचे मोल अधिक आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अशा व्यापक भूप्रदेशाचा कॅनव्हास या कादंबरीला लाभला असला तरी तिचे मुख्य केंद्र हे महाराष्ट्र भूमी हेच आहे. सकृतदर्शनी रंगनाथ पठारे आणि त्यांच्या मराठा जातीचा हा कुलवृत्तांत वाटत असला तरी त्याला जातीविशिष्टता प्राप्त झालेली नाही. महाराष्ट्रीय जगण्याची बहुस्तरीय रचना, वैविध्यपूर्ण जीवनरीत, मूल्यव्यवस्था, श्रमसंस्कृती, ज्ञानव्यवस्था, लढाऊ बाणा, युध्दशास्त्र, शेती आणि गावगाडा अशा अनेक अंगांना स्पर्श करत ही कहाणी सर्वांची होऊन जाते. त्यामुळेच महाराष्ट्रीय समाजाच्या सांस्कृतिक जगण्याचा कुलवृत्तांत म्हणून या कादंबरीचा निर्देश करणे आवश्यक ठरेल.

कालसंवादी प्रमाण आणि लोकभाषेच्या उपयोजनामुळे या कादंबरीचे निवेदन प्रवाही झालेले आहे. त्यात सहज-सुलभता असल्याने ही भाषा वाचकांना गुंतवून ठेवते. कथानकाची मांडणीही कुतूहल जागवणारी असल्याने ती वाचकांना खिळवून ठेवत संपूर्ण कादंबरी वाचावयास भाग पाडते. यादवकाळ, निजामशाही, आदिलशाही, पेशवाई, ब्रिटिश राजवट, आधुनिक काळ, स्वातंत्र्योत्तर काळ अशा वेगवेगळ्या काळाचा दीर्घ पट मांडताना ही भाषा वाचकाला रसग्रहणात-आकलनात कुठेही अडसर ठरत नाही. उलट प्रमाण-बोलीचा हा मिश्र भाषासंयोग त्या-त्या काळाच्या गोष्टीला प्रभावीरित्या पुढे नेत परिणामकारक होतो.

'काय समजानी झालंय', 'माझी भैन. मेरा भैन', 'आरे त्यो जित्ता हाये दोडांनोऽऽ', 'मैंने आपको कई दफा देखा है', 'पेंढारी?' 'आवई व्हतीच तिच्यामायला सका त्यांछे!', किंवा 'काय सांगतोयस काय! तसे असेल तर आपण एकमेकांचे कझिन्स झालो.'' या प्रकारचे संवाद आणि प्रमाण भाषेतील प्रवाही विचारगर्भ निवेदनाने ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली आहे. ''माझ्या देशातील गरीब हे तमाम दुनियेतील गरीबांपेक्षा गरीब आहेत, हे मी मान्यच करतो. पण तसे जगणे केवळ इथेच शक्य आहे. इथली हवा, पाणी आणि अन्न तशी तुम्हाला संधी देते. काही किमान गोष्टींची पूर्तता झाली की तुम्ही इथे जगू शकता.'' यासारख्या अनेक निरीक्षणांनी हे निवेदन अधिक प्रगल्भ आणि परिपक्व झालेले आहे.

कोणत्याही कांदबरीला नुसत्या तपशीलांनी कादंबरीपण प्राप्त होत नाही; तर ती कादंबरी कोणते सामाजिक तत्त्वज्ञान घेऊन साकारते यावर तिच्या कादंबरीपणाची योग्यता अवलंबून असते. सामाजिक परिवर्तनाचा सत्यशोध या कादंबरीतून पठारे यांनी घेतलेला आहे. त्या अनुषंगाने आवश्यक असणारे सामाजिक तत्त्वज्ञान आणि संशोधनपूर्ण निरीक्षणांची कांदबरीगत योजना लेखकाने या महागोष्टीत मिसळून टाकल्याने एक परिणामकारक वैचारिक संस्कार ही कादंबरी घडवते. मराठी विचारविश्वालाही काही नवी दृष्टी देण्याची क्षमता ही कलाकृती बाळगून आहे.

यादृष्टीनेही ही कादंबरी महत्त्वाची वाटते. कोणत्याही कादंबरीचे श्रेष्ठत्त्व हे तिच्या बहुआवाजीपणात आणि जीवनाच्या समग्र दर्शनात असते. यात माणूस-समूह, त्याच्या भाव-भावना, मानसिक आंदोलने, त्याच्या भोवती असणाऱ्या सर्व समाजव्यवस्था, त्यांना जोडून येणारी सर्व प्रकारची घटिते, अनेक पात्रे, कथानके-उपकथानके, कालखंडाचा व्यापक पट, भू-जैविकता, भाषिक सघनता अशा अनेक अंगाचे दर्शन तीमधून घडणे अपेक्षित असते. यादृष्टीने ही कादंबरी यशस्वी ठरलेली आहे. एकविसाव्या शतकाच्या मराठी कादंबरीच्या पुढील दिशा विस्तारण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड म्हणून या कादंबरीचा निर्देश करता येईल.

●●●

दीपावली, पाडवा व नूतन वर्षाच्या



'अक्षय प्रकाशन', नाशिक
यांच्यावतीने हार्दिक शुभेच्छा!





Scanned with OKEN Scanner